**नियमीत दिवाणी मुकदमा नं. ७१/२०१६ मधील निशाणी ७७ वरील आदेश**

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज त्यांनी हजर केलेल्या कागदपत्राना अनुसरुन सरतपास घेण्याची परवानगी मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

**०२.** वादीचे कथन असे की, याकामी जिल्हा न्यायालयातून काही महत्वाची कागदपत्रे मागवण्यात आलेली होती. सदरील कागदपत्रे या न्यायालयात आलेली आहेत. यापुर्वी वादीचा सरतपास पुर्ण झालेला असून दावा वादीच्या उलटतपासकरीता आहे. मात्र सदरील कागदपत्रे वादीचा सरतपास दाखवून उभयपक्षकारांना न्याय मिळणेकरीता शाबीत करुन घ्यावयाचे आहेत. तरी याकरीता वादीचा सरतपास घेण्याची परवानगी मिळावी अशी विनंती केली आहे.

**०३.** प्रतिवादी यांनी अर्जावरच आपले म्हणणे सादर करुन प्रस्तुतच्या अर्जास प्रखर विरोध दर्शविला आहे. त्यांचे कथन असे की, सदरचा अर्ज वेळकाढूपणासाठी व व सदभावनेचा नाही. तसेच दाव्यास विलंब व्हावा या वाईट हेतुने दाखल केला आहे. सबब, सदरचा अर्ज नामंजुर करावा असे म्हणणे दिले आहे.

**०४.** अर्ज व म्हणणे वाचून पाहिले. उभय पक्षकारांचे विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. निशाणी क्र. ७१ चे फेरीस्तासोबत कुडाळ येथील दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) यांचे न्यायालयातील रे.दि.मु.नं. ६७/१९९६ मधील नि. ९१ ची सही शिक्क्याची नक्कल वादीने हजर केले आहे. सदर दस्तऐवजाच्या अनुषंगाने वादी यास पुन्हा सरतपास घ्यावयाचा आहे. प्रस्तुतचा दावा हा वादीच्या उलटतपासावर प्रलंबित असल्याचे दिसून येते. एखादा दस्तऐवज वादीने हजर केलेला असल्यास त्यातील मजकुर शाबीत करण्याची जबाबदारी

ही कायद्याने वादीची आहे. प्रस्तुत दस्तऐवजाचे अवलोकन केले असता सदर दस्तऐवज हा न्यायालयातील जबाबाची सहीसुद नक्कल असल्याचे दिसून येते. वादीच्या कथनांप्रमाणे वादीस प्रस्तुत दस्तऐवजाच्या अनुषंगाने सरतपास घ्यावयाचा असल्याने त्यांना संधी देणे उचीत राहिल. तसेच, वादीस त्यांच्या विनंतीनुसार सरतपासाची संधी दिल्यास प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही कारण सदर दस्तऐवजाच्या अनुषंगाने त्यांना उलटतपास घेण्याची मुभा आहे. सबब, अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. माझे उपरोक्त विवेचनावरुन मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. वादी यांना निशाणी ७१ चे फेरीस्तासोबत जबाबावर येथील सरतपास देण्याची परवानगी देण्यात येत आहे.

३. वादीने पुढील तारखेस न चुकता निशाणी ७१ सोबत हजर केलेला दस्तऐवजाच्या अनुषंगाने हजर राहून त्यांचा पुढील सरतपास पुर्ण करायचा आहे.

Digitally signed by PAWAN RAMBHAU DHORE
Date: 2024.07.25 19:14:50 +0530

दिनांक – २४/०७/२०२४

(पी.आर.ढोरे)
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर
कुडाळ